पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल)

सूचना

क्रमांकः- नरवि/कावि/ ६/ ५८१ /२०१९.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे ताथवडे गावाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्र. टीपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/वियो मंजूरी/नवि-१३, दिः-०६/०१/२०१७ अन्वये, तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/ई.पी.मंजूरी/नवि-१३, दिः- ०३/१०/२०१८ अन्वये मंजूर आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली )

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत स.नं. ७ मध्ये दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित केला आहे. ( यापुढे " उक्त रस्ता" म्हणून संबोधित केलेला )

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील स.नं. ७ या जागेमधील १२.०० मी. विकास योजना रस्त्याची आखणी स.नं. ८ च्या मध्यातून प्रस्तावित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्र. टिपीएस-१८१९/३६२/प्र.क्र.५३/१९/नवि-१३, दिः- २७/०५/२०१९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस निदेश आहेत. ( यापुढे " उक्त निदेश" म्हणून संबोधित केलेला )

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४१९, दिः- २०/०६/२०१९ अन्वये पारित केलेल्या ठरावात मौजे ताथवडे गावाचे उक्त विकास योजनेतील स.नं. ७ या जागेमधील १२.०० मी. विकास योजना रस्त्याची आखणी स.नं. ८ च्या मध्यातून प्रस्तावित करण्यासाठी उक्त निदेशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता प्रदान केली आहे. (यापुढे "उक्त ठरावातील विषय" म्हणून संबोधित केलेला )

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त रस्त्याची आखणी स.नं. ७ ऐवजी स.नं. ८ च्या मध्यातून प्रस्तावित करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची विहित कार्यवाही उक्त निदेश व उक्त ठरावातील विषयानुसार करण्याचे योजिले आहे. ( यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव " म्हणून उल्लेख केलेला )

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल प्रस्ताव दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

उक्त फेरबदल प्रस्तावाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११० १८ यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त फेरबदल प्रस्तावाबाबत विहित मूदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे प्राप्त झालेल्या हरकती / सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापुर्वी केला जाईल.

( श्रावण हर्डीकर)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

ठिकाणः- पिंपरी.
दिनांकः-२६/०७/२०१९.

(टिपः- सदर सूचना व उक्त फेरबदल प्रस्तावाचा नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,**

**Modification under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966**

**Notice**

No. TPS/WS/6/591/2019.

Whereas, the Development Plan of Tathawade village of Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra, Urban Development Department, vide Notification No: TPS -1815/2012/CR-84/15/D.P.Sanction/UD-13, dated 06/01/2017 and also by the Government of Maharashtra, Urban Development Department, vide Notification No: TPS -1815/2012/CR-84/15/E.P.Sanctioned/UD-13, dated 03/10/2018. (hereinafter referred to as the "said Development Plan")

And whereas, in the said Development Plan, 12.00 m. wide North-South road has been proposed in S.No. 7. ( hereinafter referred to as the "said Road")

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department vide Order No. TPS 1819/362/CR53/19/UD-13, dated 27/5/2019 directed Pimpri Chinchwad Municipal Corporation to complete the modification procedure in the said Development Plan as laid down under section 37 (1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 and submit the proposal for sanction of government to change the alignment of 12.00 m wide D. P. road from S.No. 7 to the middle of S.No. 8. (hereinafter referred to as the "the said Directive")

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide Resolution No: 419, dated 20.06.2019 to complete the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 and submit the proposal for sanction of the government as per the said Directives so as to change the alignment of 12.00 m wide D. P. road from S.No. 7 to the middle of S.No. 8 of the said Development Plan of Tathwade village which is the subject of this resolution. (hereinafter referred to as the "subject of the said Resolution")

And whereas, as per the said Directives and the subject of the said Resolution, the Municipal Corporation intends to initiate the modification procedure in the said Development Plan as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to change the alignment of the said Road instead of from S.No. 7 to the middle of S.No. 8. ( hereinafter referred to as the "said Modification")

And therefore, the copy of plan showing the said modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune - 411 018 .

Any person having any suggestion and / or objection regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune – 411 018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government.

The suggestions and / or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal of modification to the Government of Maharashtra for sanction.

(Shravan Hardikar)

Commissioner,


Pimpri Chinchwad Municipal Corporation,

Pimpri, Pune- 18

Place- Pimpri.

Date- 26/07/2019

(Note: The said Notice & plan showing modification proposal is also available on the website of P.C.M.C. – www.pcmcindia.gov.in)




खुलासा:-

- मंजूर विकास योजनेतील आरक्षण
- मंजूर विकास योजनेतील रस्ता / रस्तारुंदी
- रहिवास विभाग
- निळी पुररेषा
- लाल पुररेषा
- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव असे.

(प्रमाण १:५०००)

(शासनाचे दि:- २७/५/२०१९ रोजीचे निदेश व मा. महापालिका सभा ठराव क्र. ४१९,दि: २०/०६/२०१९ अन्वये स.नं. ७ मधील विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याची आखणी स.नं. ८ च्या मध्यातून करण्याविषयीचा फेरबदल प्रस्ताव असे.)

उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका